महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६ चे
कलम १५४(१) अन्वये शासन निदेश.

# महाराष्ट्र शासन
## नगर विकास विभाग
### मंत्रालय, मुंबई :४०० ०३२.
### दिनांक :- २२ मे, २०२०

**शासन निर्णय क्र.** टिपीबी-४३१९/१८९/प्र.क्र. १२३/२०१९/नवि-११

**वाचा :-** शासन नगर विकास विभागाकडीलआदेश क्र. टिपीबी-४३१९/१८९/प्र.क्र.१२३/२०१९/ नवि-११, दि. २०/०८/२०१९ द्वारे देण्यात आलेले कलम १५४(१) अन्वये शासन निदेश.

**प्रस्तावना :-**

बृहन्मुंबई मधील बांधकाम व्यवसायाला उभारी देण्यासाठी विविध उपाययोजना करण्याबाबत, बृहनमुंबई महानगरपालिका / म्हाडा यांना बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली- २०३४ मधील विविधी तरतुदीअंतर्गत भरणा करावयाच्या अधिमूल्याचे दर कमी करण्याबाबत विविध संस्थांकडील विनंती अर्ज, बृहन्मुंबई महानगरपालिका, म्हाडा यांचे पत्र इत्यादी विचारात घेवून शासन नगर विकास विभागाने दि. २०/०८/२०१९ रोजीच्या आदेशाद्वारे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४(१) अन्वये निदेश दिले आहेत. त्यानुसार बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मधील विविधी तरतुदीअंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेस भरणा करावयाचे अधिमूल्य दर दोन वर्षांचे कालावधीसाठी कमी करण्यात आले आहेत.

बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ चे विनियम ३१(३) मध्ये रहिवास, वाणिज्य व औद्योगिक प्रयोजनार्थ विकासासाठी ३५% क्षेत्र Fungible compensatory area म्हणून अधिमूल्याचे भरणा करण्याचे अटीवर उपलब्ध होतो. शासनाकडील दि. २०/०८/२०१९ रोजीचे कलम १५४ खालील निदेशाद्वारे त्यापैकी रहिवास तसेच वाणिज्य प्रयोजनार्थ फंजिबल क्षेत्रासाठी अधिमूल्याचे दरात सुधारणा करण्यात आली. तथापि, त्यामध्ये औद्योगिक क्षेत्राचे फंजिबल क्षेत्राचा समावेश करण्याचे राहून गेले होते. रहिवास प्रयोजनार्थ फंजिबल क्षेत्रासाठी अधिमुल्याचे दर रेडीरेकनरच्या दराच्या ५०% ऐवजी ३५% तर वाणिज्य प्रयोजनार्थ फंजिबल क्षेत्रासाठी अधिमूल्य दर ६०% ऐवजी ४०% असे सुधारीत करण्यात आले आहेत. तथापि, औद्योगिक प्रयोजनार्थ फंजिबल क्षेत्राचे अधिमूल्याचा उल्लेख त्यामध्ये नसल्याने वाणिज्य फंजिबल क्षेत्राचे धर्तीवर औद्योगिक फंजिबल क्षेत्रासाठी ४०% दराने अधिमूल्य आकारणी करणेबाबत मे. क्रेडाई-एमसीएचआय यांनी त्यांचेकडील दि. १४/०१/२०२० रोजीचे पत्राद्वारे उपरोक्त तरतूदी बाबत स्पष्टीकरण अपेक्षिले आहे. त्यानुसार अर्जदार यांची विनंती उचित असल्याने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४(१) अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नियोजन प्राधिकरणांना याद्वारे पुढीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत.

## निदेश

१) बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ चे विनियम ३१(३) मध्ये रहिवास, वाणिज्य व औद्योगिक प्रयोजनार्थ विकासासाठी ३५% क्षेत्र Fungible compensatory area म्हणून अधिमूल्याचा भरणा करण्याचे अटीवर उपलब्ध होतो. शासनाकडील दि. २०/०८/२०१९ रोजीचे कलम १५४ खालील निदेशाद्वारे त्यापैकी रहिवास तसेच वाणिज्य प्रयोजनार्थ फंजिबल क्षेत्रासाठी अधिमूल्याचे दरात सुधारणा करण्यात आली आहे.

शासनाकडील दि. २०/०८/२०१९ रोजीचे निदेशानुसार वाणिज्य प्रयोजनार्थ फंजिबल क्षेत्रासाठी अधिमूल्याचे दरात करण्यात आलेल्या सुधारणांचे धर्तीवर दोन वर्षांचे कालावधीकरीता औद्योगिक प्रयोजनार्थ फंजिबल क्षेत्रासाठी देखील विद्यमान तरतूदीतील अधिमूल्य दर ६०% ऐवजी रेडीरेकनरचे ४०% दराने आकारणी करण्यात यावी.

२) सदरचे निदेश हे तात्काळ अंमलात येतील.

सदरहु शासन निदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in (कायदा /नियम ) या वेबसाईटवर देखील उपलब्ध आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( निर्मलकुमार पं. चौधरी )
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई
यांस माहिती व उचित कार्यवाहीसाठी.

प्रत माहितीस्तव :-

(१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
(२) उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई, इन्साहटमेंट, महापालिका मार्ग, मुंबई- ४००००१.
(३) प्रमुख अभियंता ( विकास नियोजन), बृहन्मुंबई महानगरपालिका.
(४) निवड नस्ती (नवि-११)